NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०४.११.२०२६ बुधवार

पोलीस आयुक्तालय अंतर्गत आयोजीत ''संभाषण कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा'' संपन्न :–

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे संकल्पनेतुन तसेच, मार्गदर्शनाने आणि उपस्थितीत नागपूर शहर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या संवाद कौशल्यात वाढ व्हावी, नागरीकांशी प्रभावी व सकारात्मक संवाद साधता यावा तसेच, पोलीस दलाची प्रतिमा अधिक लोकाभिमुख होण्यास मदत व्हावी या उद्देशाने दिनांक ०२.११.२०२६ ते दि. ०४.११.२०२६ रोजी दरम्यान, संभाषण कौशल्य या विषयावर कार्यशाळा पोलीस भवन, ऑडीटोरीयम हॉल येथे आयोजीत करण्यात आली होती. कार्यशाळेकरीता आरंभी क्रिएशन्स, ठाणे च्या संस्थापीका मा. श्रीमती सानिका कुलकर्णी, (पत्रकार व व्यक्तीमत्व विकास मार्गदर्शीका) हया प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित होत्या. मा. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपुर शहर यांचेहस्ते रोपटे देवुन करण्यात आले. कार्यक्रमाकरीता मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) उपस्थीत होते.

कार्यशाळेदरम्यान, प्रमुख पाहुण्यांनी उपस्थतीतांना प्रभावी संभाषण, नागरीकांशी संवाद साधण्याची योग्य पध्दत, देहबोली, आत्मविश्वासपुर्ण संवाद, सकारात्मक दृष्टीकोन आणि सार्वजनिक ठिकाणी संवाद साधताना घ्यावयाची काळजी अशा विविध विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या दैनंदीन कामकाजात संवाद कौशल्याला अनन्यसाधारण महत्व असुन, या प्रशिक्षणामुळे नागरीकांशी संवाद अधिक प्रभावी व विश्वासार्ह होण्यास निश्चीतच मदत होणार असल्याचे नमुद केले.

कार्यशाळेकरीता नागपुर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने हजर होते.









(कामगिरी)

१) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथक पोलीसांची कामगिरी :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०४.११.२०२६ चे ०२.३० ते ०३.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग असता, त्यांना पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत गुलाब बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स समोर आमरोडवर एक विनानंबर ची ॲक्टीवा मोपेडवर एक इसम भरधाव वेगाने जात असतांना दिसुन आला. त्याचा पाठलाग करून, त्यास थांबविले व ॲक्टीवा चालकास पंचासमक्ष त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दिव्यांश सतीष पौनिपगार, वय १९ वर्षे, रा. श्रावस्ती नगर, बुध्दविहार जवळ, बाराखोली, इंदोरा, जरीपटका, नागपूर असे सांगितले. त्याची व त्याचे ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता, ॲक्टीवाचे डिक्कीमध्ये एक लोखंडी चाकु किमती ५००/–रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने आपले ताब्यातील वाहनात शस्त्र बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक करण्यात आली. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

२) पोलीस उपायुक्त परि.क्र. ०२ विशेष पथकाची कामगिरी :– सट्टापट्टीवर जुगार खेळणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०२.११.२०२६ चे १६.२० वा. ते १७.०५ वा. चे दरम्यान, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ०२ यांचे विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, नेल्सन हॉस्पीटल समोर, सार्वजनिक ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) ऋषी झिंगरूजी धुर्वे, वय ४६ वर्षे, २) अनिता अरूण नेवारे, वय ४२ वर्षे, दोन्हीही रा. तकीया, सुळे महीला गल्ली, धंतोली, नागपुर हे कल्याण नावाचे मटक्यावर पैश्याची बाजी लावुन, आकड्यांची खायवडी करून, हार–जीतचा जुगार खेळवतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ५,६१५/–रू., ०२ मोबाईल फोन, वेगवेगळ्या आकड्याच्या नोंदी असलेल्या सट्टापट्टी व ईतर साहित्य असा एकुण २०,६२०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे धंतोली येथे कलम १२(अ) महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.२) यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. जावेद तडवी, पोहवा. परवेझ, सदाशिव, संदीप व मपोअं. संगीता बोकडे यांनी केली.

३) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथक पोलीसांची कामगिरी :– नायलॉन मांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०४.११.२०२६ चे १४.१० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, पोलीस ठाणे अंबाझारी हद्दीत, विजय अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३०३, शंकर नगर चौक, अंबाझरी रोड, नागपुर येथे सापळा रचुन रेड कार्यवाही केली असता, तेथे एक ईसम मिळुन आला. त्यास पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अदीशराज विरेंद्र झा, वय १९ वर्षे, रा. घटनास्थळ असे सांगीतले. त्याचे ताब्यातील फ्लॅटची पाहणी केली असता, तेथे शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा मोनोकाईट लेबल असलेल्या एकुण ५३ चक्की मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन नायलॉन मांजाच्या चक्की किंमती १,५९,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं., सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम–१९८६ अन्वये होत असल्याने आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननावरे त्यांचे पथकातील ईतर अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे वाडी :– हद्दपार ईसमास अटक.

दिनांक ०३.११.२०२६ चे २३.२० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगार तपासणी मोहीम दरम्यान पेट्रोलींग करीत असता, त्यांना प्लॉट नं. ३८६, न्यु स्टार पब्लीक स्कुल चे बाजुला, सोनबा नगर, खडगांव रोड, वाडी, नागपुर येथे राहणारा हद्दपार इसम अशोक उर्फ भोला मोहन

निंबाळकर, वय ४२ वर्षे हा त्याचे राहते घरी मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ५५५५/२०२५ दिनांक ०६.११.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनि. उत्तम जायभाये यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सतीष मेश्राम यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे मानकापुर :– सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल.

दिनांक ०३.११.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत बैलवाडा, पोस्ट गुमथी, तह. खापरखेडा, जि. नागपुर येथे राहणारे पंकज ओमप्रकाश फलके, वय ४२ वर्षे हे त्यांची पत्नी नामे सौ. अश्वीनी पंकज फलके, वय ३५ वर्षे व मुलगा नामे अद्वीत पंकज फलके, वय ५ वर्षे असे तीघे त्यांचे होंडा युनिकॉर्न दुचाकी क्र. एम.एच ४० ए.बि ८९४७ ने पोलीस ठाणे मानकापुर हद्दीतील झिंगाबाई टाकळी, गारवा बिर्याणी समोरील रोडने जात असतांना, एका टाटा ट्रक क्र. एम.एच ३१–४६०२ चा चालक नामे शेख जिमल शेख सलाम, वय ४५ वर्षे, रा. देशराज नगर, गौसिया मस्जीद जवळ, सुरेंद्रगढ, गिट्टीखदान, नागपुर याने वाहन नो–एन्ट्री झोनमध्ये बेदरकारपणे चालविल्याने इतरांचे जिवीतास धोका निर्माण होवु शकतो हे माहीत असतांनासुध्दा त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन युनिकार्न दुचाकी ने जाणाऱ्या ईसमांना धडक मारल्याने, दुचाकीवरील सौ. अश्वीनी ह्या ट्रकचे चाकाखाली येवुन, त्यांचा जागीच मृत्यु झाला. दुचाकीवरील ईतर दोन जण किरकोळ जखमी झाले. ट्रकचालक घटनास्थळावरून पळुन गेला. मृतक सौ. अश्वीनी यांचे प्रेत पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे. ईतर जखमी यांचा उपचार त्यांचे नातेवाईकांनी खाजगी दवाखान्यात केला आहे.

याप्रकरणी फिर्यादी राहुल मधुकर मनोहर, वय ४४ वर्षे, रा. घर क्र. ३७३, भिमनगर, गोधनी रेल्वे स्टेशन रोड, गोधनी रेल्वे, मानकापुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. अजय जाधव ९८२३०६९२५१ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०५, २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. १२ वे सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.	३२४१/२०१८	कलम ८२ सिआरपिसी	१) राजा उर्फ फिरोज इस्राईल अन्सारी, वय २३ वर्षे, रा. सैलाब नगर, ड्रॅगन पॅलेस जवळ, जुनी कामठी, नागपुर. २) शेख शफीक शेख शब्बीर, रा. फरीद नगर, खरबी, हसनबाग मस्जीद जवळ, नंदनवन, नागपुर.	०७.११.२०२६

(मिसींग)

१) पोलीस ठाणे पारडी :– फिर्यादी सौ. चित्ररेखा राजेश कवर, वय २९ वर्षे, रा. गंगाबाग, तलमलेवाडी दर्गाह समोर, अशोक खोब्रागडे यांचे घरी किरायाने, पारडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे पारडी येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे राजेश तिजुराम कवर, वय ३६ वर्षे हे दिनांक ०५.१०.२०२६ चे ०८.०० वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरून बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे, अंगात– गुलाबी शर्ट व काळा पॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.

२) पोलीस ठाणे सिताबर्डी :– फिर्यादी गंगाराम आसाराम परतेती, वय ४६ वर्षे, रा. परडीया थाना, बट्टाथापा, जि. छिंदवाडा, मध्य प्रदेश यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे तक्रार दिली की, त्यांचा भाऊ नामे मकरलाल आसाराम परतेती, वय २८ वर्षे हा दिनांक ०६.१०.२०२६ चे ०९.०० वा. रोजी चेन्नई येथे कामाकरीता जाण्यासाठी पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत एम.पि. बसस्टॉप येथे आला असता, तेथे कोणाला काहीही न सांगता तेथुन बेपत्ता झाला. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ७ इंच, केस–काळे कुरळे, अंगात– पांढरी टि–शर्ट व काळा पॅन्ट व काळ्या रंगाची पायाल चप्पल घातलेले आहे. भाषा– हिंदी/छत्तीसगढी बोलतो.



राजेश



मकरलाल

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखा प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी, नागपूर शहर अंतर्गत, भारतीय जनता पार्टी चे वतीने दिनांक ०५.११.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. यशवंत स्टेडियम ते झिरो माईल पर्यंत अराजकता हटाव देश बचाव पायदळ रॅली चे आयोजन केले आहे. नमुद पायदळ रॅली मध्ये अंदाजे २०,००० ते ३०,००० महिला/पुरुष उपस्थित राहणार आहे. नमुद पायदळ रॅली दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रॅलीचे रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- धंतोली अंडर ब्रिज कडून मेहाडीया चौकाकेडे येणारी वाहतूक ही धंतोली अंडरब्रीज चौकातून (पोलीस ठाणे धंतोली) कॉग्रेस नगर चौकाकडुन व इंडीयन जिमखाना कटींग मधुन जातील.
- वर्धा रोड कडून पंचशील चौकाकडे जाणारी वाहतूक ही लोकमत चौकातून डावे वळन घेवून कल्पना बिल्डींग मार्गे सोयीने जातील.
- अलंकार चौकाकडुन लायब्ररी चौक मार्गे झाशी राणी चौका कडे जाणारी वाहतूक ही लायब्ररी चौकातून डावे व उजवे वळन घेवून सोयीने जातील.
- मुंजे चौकातील वाहतूक ही यशवंत स्टेडीयम, झाशी राणी चौक, व्हेरायटी चौकाकडे आवश्यकते नूसार वाहतूक वळवण्यात येईल.
- भोले पेट्रोल पंप चौकाकडुन महाराजबाग चौक मार्गे व्हेरायटी चौकाकडे जाणारी वाहतूक ही महाराजबाग चौकातून डावे व उजवे वळन घेवून सोयीने जातील.
- बर्डी मेन मार्केट कडून व्हेरायटी कडे जाणारी वाहतूक ही बर्डी मेन मार्केट मधिल मोदी नं. १, २, ३ किंवा सुपर मार्केट येथून डावे व उजवे वळन घेवून पूढे जातील.
- मानस चौक कडून मॉरेस चौका कडे जाणारी वाहतूक ही मानस चौकाकडून उजवे व डावे वळन घेवून पूढे सोयीने जातील.
- फॉरेस्ट ऑफिस चौकाकडून झिरो माईल चौकाकडे जाणारी वाहातूक ही फॉरेस्ट ऑफिस चौक येथून डावे किंवा उजवे वळन घेवून पूढे सोयीने जातील.
- कन्नमवार चौका कडुन संविधान चौकाकडे जाणारी वाहतूक ही डावे किंवा उजवे वळन घेवून पूढे जातील.
- रहाटे चौका कडुन मॉरेस चौकाकडे उड्डाणपूलावरून जाणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करून कृपलानी चौकातून डावे वळण घेवून दिक्षाभुमी, वेस्ट हायकोर्ट रोड मार्गे आवश्यकतेनुसार मार्गाचा वापर तसेच उजवे वळण घेवुन अजनी रेल्वे स्टेशन, कॉग्रेस नगर मार्गाचा वापर करतील.

सदर अधिसुचना दिनांक ०५.११.२०२६ चे १४.०० वा पासुन ते पायदळ रॅली संपेपर्यत अंमलात राहील.

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/-
(आदित्य मिरखेलकर, भापोसे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर